# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक :- 2/एनजीसी/अधिसूचना/2013/९५५
दिनांक : 30 जानेवारी, 2013

## अधिसूचना

या संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविकोत्तर / पदव्युत्तर पदविका या व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडे केलेल्या अर्जावर शासनाचे अभिप्राय / शिफारस परिषदेस सादर करण्याच्या अनुषंगाने www.dte.org.in/courseapproval2013 या लिंक वर ऑन लाईन द्वारे अधिसूचना क्र. 2/एनजीसी/अधिसूचना/2013/56, दि. 11 जानेवारी, 2013 अन्वये दि. 31.01.2013 पर्यंत माहिती भरण्यासाठी सूचित केले होते. दरम्यानच्या कालावधीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने अर्ज करण्यास दि. 10.02.2013 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. ही बाब विचारात घेऊन परिषदेस सादर केलेल्या अर्जाची माहिती या संचालनालयाच्या संकेतस्थळावरील www.dte.org.in/courseapproval2013 या लिंकवर भरण्यासाठी दि. 10 फेब्रुवारी 2013 पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी, संबंधित संस्थांनी संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड द्वारे लॉगइन करुन परिषदेस सादर केलेल्या अर्जाची माहिती दि. 10 फेब्रुवारी, 2013 पर्यंत भरुन त्यांनी भरलेल्या अर्जाची माहिती निश्चित (Confirm) करावी. या संचालनालयाच्या संकेतस्थळी उपलब्ध झालेल्या अर्जांची तपासणी करुन त्यावर शासनाचे अभिप्राय परिषदेस विहित कालमर्यादेत सादर करण्यासाठी संबंधित संस्थाच्या सुनावणीचे वेळापत्रक खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय | दिनांक | ठिकाण व वेळ |
|---|---|---|
| अमरावती, मुंबई, नागपूर व नाशिक या विभागाच्या कार्यकक्षेतील संस्था | दि. 11.02.2013 | सकाळी 11.00 वाजता<br>तंत्र शिक्षण संचालनालय समिती सभागृह |
| पुणे व औरंगाबाद या विभागाच्या कार्यकक्षेतील संस्था | दि. 12.02.2013 | सकाळी 11.00 वाजता<br>तंत्र शिक्षण संचालनालय समिती सभागृह |

उपरोक्त वेळापत्रकानुसार संबंधित संस्थानी सुनावणीस उपस्थित राहतांना परिषदेस सादर केलेला प्रस्ताव व खालील कागदपत्रांचा एक स्वतंत्र संच सादर करावा.

1. विहित नोंदणी शुल्क भरल्याची पावती
2. प्राचार्य / संचालक नियुक्तीस संबंधित विद्यापीठाच्या मान्यता / शैक्षणिक अर्हतची कागदपत्रे
3. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचा अद्ययावत [latest] डेफिसिअन्सी रिपोर्ट (प्राचार्यांनी प्रमाणित केलेला)
4. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचा परिषदेस सादर केलेला (पार्ट - I व पार्ट - II ) अर्ज
5. संस्था प्रमुखांनी प्रमाणित केलेले दोन प्रतीत ॲनेक्चर - सी व डी (प्रपत्र).
6. सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केलेल्या जागा / बांधकाम / इमारतीचे नकाशे, ऑक्युपेन्सी प्रमाणपत्र इ.
7. अभ्यासक्रम बंद करणे किंवा प्रवेश क्षमता कमी करण्यासाठी अर्ज असल्यास संस्थेचा ठराव, संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र व कर्मचारी/ विद्यार्थ्यी यांचे समावेशन तसेच याबाबत उद्भवणा-या कायदेशीर बाबीस संस्था जबाबदार राहील या आशयाचे नोंदणीकृत हमीपत्र.

(स्वाक्षरी)
(डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,
1) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
2) सिस्टीम मॅनेजर, तंत्र शिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, कार्यासन क्रमांक 3, संगणक कक्ष, मुंबई

~~पृष्ठांकन क्र. विकाऔ/शिक्षण/13/~~ ६२९
~~दिनांक~~ - 10 FEB 2013

~~तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद अधिनस्त, प्राचार्य, पदवी, पदविकोत्तर / पदव्युत्तर पदविका संस्था यांना माहितीस्तव.~~

(स्वाक्षरी)
सह संचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
औरंगाबाद.

या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना सुचित करण्यात येते की, सदर पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर "प्रवेशक्षमता वाढ / नविन संस्था" या शिर्षखाली प्रसिद्ध करावे.